# व्हिडिओकॉन 'डी२एच'चे बिल मोबाईलद्वारे भरता येणार

**मुंबई, ता. ८ :** व्हिडिओकॉन 'डी२एच'ने मोबाईल पेमेंट क्षेत्रातील आघाडीच्या ॲटम टेक्नॉलॉजीजशी भागीदारी करून ग्राहकांसाठी मोबाईलवर आधारित डीटीएच रिचार्ज सेवा सुरू करीत असल्याचे नुकतेच जाहीर केले.

व्हिडिओकॉन 'डी२एच'चे ग्राहक मोबाईलवर <atom> हा संदेश लिहून तो ५४९५१ या क्रमांकावर पाठवून 'ॲटम' नावाचे ॲप्लिकेशन सहजतेने डाऊनलोड करून अकाऊंट तत्काळ रिचार्ज करू शकतील. नोंदणी पूर्ण केल्यानंतर ग्राहकांना ही सेवा उपलब्ध होणार असून, क्रेडिट कार्डांचा उपयोग करून अकाऊंट रिचार्ज करू शकणार आहेत.

याबाबत कंपनीचे 'सीईओ' अनिल खेरा म्हणाले, ''रिचार्ज करण्यासाठी ग्राहक सोपे आणि सहज पर्यायाच्या शोधात असतात हे आयव्हीआर प्लॅटफॉर्मच्या यशातून सिद्ध होते. देवाणघेवाण करण्यासाठी सुरक्षित आणि वापरासाठी सोपे प्लॅटफॉर्म पुरविण्यासाठी ॲटम टेक्नॉलॉजीजच्या सिद्ध झालेल्या तंत्रज्ञानाचा आम्हाला आमच्या ग्राहकांना सोपे सोल्यूशन देण्यामध्ये मदत होणार आहे.''